# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in

**तात्काळ:**

जा.क्र.तंशिविकापु/विवि/३३ कोटी वृक्षलागवड/२०१९/ 2972
दिनांक : 19 JUL 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या **सांगली जिल्हयातील**
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित /
विना अनुदानित पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी सस्था.

**विषय :- ३३ कोटी वृक्ष लागवडीची उद्दिष्टपूर्ती करण्याबाबत...**
संदर्भ :- १. उप वनसंरक्षक, वन विभाग, सांगली यांचे पत्र जा.क्र.योजना/३३ कोटी/२०१९-२०/९५६, दि. १७.०७.२०१९
२. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.तंशिविकापु/विवि/३३ कोटी वृक्षलागवड/२०१९/२८४५, दि. ०९.०७.२०१९

उपरोक्त विषयाच्या संदर्भ क्र. १ च्या पत्रास अनुसरुन, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सांगली, जिल्हयातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व संस्थाप्रमुखांना सूचित करण्यात येते की, सांगली जिल्हयाकरीता वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत सन २०१९ च्या पावसाळयात एकूण १६०७५ इलके वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आलेले असून, त्यापैकी **दि. १६.०७.२०१९ अखेर केवळ ८७५** इतकी वृक्ष लागवड केल्याबाबत ऑनलाईन नोंदीवरुन दिसून येत आहे.

**सदर उद्दिष्ट पूर्तीसाठी या कार्यालयाने प्रत्येक संस्थेस दिलेल्या उद्दिष्टा नुसार, वृक्ष लागवड करुन, त्याची माहिती, जिओ टॅगिंग फोटो व १० सेकंदाचा व्हिडिओ अपलोड करण्याबाबत व याबाबत काही अडचण असल्यास, आपल्या जिल्हयातील वन विभागाच्या जिल्हा तसेच तालुका स्तरीय कार्यालयाशी संपर्क करण्याबाबत वरील संदर्भ क्र. २ च्या परिपत्रकान्वये यापूर्वीच कळविलेले आहे. परंतु ब-याच संस्थांनी याबाबतची माहिती, फोटो व व्हिडिओ अद्याप अपलोड केले नसल्याचे दिसून येत आहे. सबब संबंधित कार्यालयाकडून याविषयी विचारणा होत आहे.**

तरी या पत्राव्दारे आपणास पुन्हा सूचित करण्यात येते की, या आठवडयाच्या अखेरीस मा. जिल्हाधिकारी सांगली यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आली असून, त्या दृष्टीने आपण वृक्ष लागवडीची माहिती, फोटो व १० सेकंदाचा व्हिडिओ ऑनलाईन पध्दतीने **तात्काळ** अपलोड करुन, या कार्यालयास अहवाल सादर करावा

(चं.तु..कुंजीर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.